Lokshahi 24/9/2017

# ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन १० नोव्हेंबरपासू

## उपराष्ट्रपतींच्या हस्ते होणार उद्घाटन ▸ केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची मा

लोकशाही वार्ता/नागपूर

विदर्भातील शेतकऱ्यांसाठी संपन्नतेचा महामार्ग ठरत असलेले मध्य भारतातील सर्वांत मोठे कृषी प्रदर्शन ॲग्रोव्हिजन १० ते १३ नोव्हेंबर दरम्यान रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती पत्रपरिषदेत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

याप्रसंगी बोलतांना गडकरी म्हणाले, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आघाडीवर असलेल्या सुमारे ४०० हून अधिक कृषीविषयक कंपन्या, संशोधन संस्था, नवउद्योजक, शेतकरी [illegible]ोधनं, वित्तसंस्था, कृषी विद्यापीठे, शेती संबंधीत शासकीय विभाग, सेवा पुरवठादार आदींचा सहभाग हे प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण आहे, ॲग्रोव्हिजन प्रदर्शनाचे उद्घाटन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर, राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित राहणार आहेत.

यावर्षी सुमारे २१ विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून कार्यशाळांमध्ये नवीन पिके, पाणी, व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशीपालन आदी शेतीपुरक व्यवसाय व विषयांचा समावेश आहे. याशिवाय बांबू लागवड व संधी विषयाव[र] देखील आयोजित करण्[यात] आहे. कृषी क्षेत्रातील नवीन[...] सुमारे १ लाख रु[...] प्रोत्साहनात्मक सहाय्य देण[...] असल्याचे त्यांनी सांगितले[...] शेतकऱ्यांना विविध शे[...] माहिती मिळावी म्हणून 'अ[...] ॲप'चे लोकार्पण करण्[...] विदर्भातील शेतकऱ्यांन[...] संख्येने या प्रदर्शनाचा ल[...] असे आवाहन आयोजक[...] आहे. पत्रपरिषदेत ॲ[...] सल्लागार समितीचे अध्य[...] डी. मायी, ऊर्जामंत्री [...] बावनकुळे, आ. अनिल ब[...] आ. गिरीश गांधी, माजी [...] मेघे, रमेश मानकर, रवी [...] आदी उपस्थित होते.



ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाची माहिती देताना केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गिरीश गांधी, आ. अनिल बोंडे, रवी बोरटकर.